**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१४८/२०२३**
**निशाणी क्र. ५०**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की --

माझे नांव - हर्षली धोंडीराम पाटील
वय सुमारे - ३९ वर्षे, व्यवसाय - नगर रचनाकार,
नेमणुक – नगररचना कार्यालय, सातारा.
---------------------

**<u>वादीतर्फे सरतपास ॲड. श्री. ए. के. शिंदे यांचेतर्फे सुरु</u> :**

१. मला प्रस्तुत दाव्याचे साक्षीसमन्स आले होते. मी त्याप्रमाणे कागदपत्रे माझ्यासोबत आणलेली आहेत. मी नगररचना विभाग, सातारा या कार्यालयातुन आले आहे. त्याठिकाणी मी नगर रचनाकार म्हणुन कार्यरत आहे. मी मोळेश्वर, ता.महाबळेश्वर येथील सर्वे नं.८ च्या बांधकाम परवान्याबाबतची कागदपत्रे दाखल करण्यास तयार आहे. सदर कागदपत्रे मी न्यायालयीन अधिक्षक यांचेमार्फत प्रमाणित करुन घेतली व आजरोजी दाखल केली आहेत. मला आता कागदयादी नि.क्रं.५२ लगत अ.नं.१ व २ वरील पत्र दाखविणेत आले. सर्वे नं.८ च्या बांधकामाचे पत्र आमच्या कार्यालयाला अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांचेमार्फत दि.२८.१२.१९८८ व दि.११.०१.१९८९ रोजी आले होते. त्यातील मजकुर आमच्या अभिलेखाप्रमाणे बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्रं.५३ व ५४</u>** देणेत येते. मी सर्वे नं.८ चा व त्याच्या पोटहिश्श्याचा नकाशा आजरोजी दाखल केलेला आहे. सदर नकाशा आमच्या अभिलेखाप्रमाणे बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्रं.५५</u>** देणेत येते. मी वादीचा सर्वे नं.८ पोटहिस्सा क्रं.१०/३+११/१+११/३ आणि सर्वे नं.८ पोटहिस्सा क्रं. ७/६+८/३+ १९अ+८/३+१८ब+१६क+१४ब+१९ब+२१क चे सात बारा उताऱ्याच्या प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत. सदर प्रती आमच्या अभिलेखाप्रमाणे बरोबर आहेत. त्यास अनुक्रमे **<u>नि.क्रं.५६ व ५७</u>** देणेत येते. त्याच्या दोन प्रती मी दाखल केलेल्या आहेत. मी दि.१३.१२.१९८८ रोजीचे अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी आमच्या कार्यालयास

पाठविलेले पत्र दाखल केले आहे. सदर पत्र आमच्या अभिलेखानुसार बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.५८** देणेत येते. मी आजरोजी आमच्या कार्यालयामार्फत तांत्रीक अहवाल तथा ना हरकत प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर प्रमाणपत्राचा क्रमांक बीपी/मोळेश्वर/सर्वे नं.८/१४३, दि.१७.०१.१९८९ असा आहे. त्यातील मजकुर अभिलेखाप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.५९** देणेत येते. मला आता आमच्या कार्यालयामार्फत बांधकामासाठी वादीला जो आराखडा मंजुर करुन देण्यात आला होता त्याची प्रमाणीत प्रत दाखविणेत आली. सदर आराखडा आमच्या कार्यालयातील अभिलेखानुसार बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.६०** देणेत येते.

**उलटतपास प्रतिवादींतर्फे सरकारी वकील श्री. ए. आर. कुलकर्णी यांचेतर्फे** :

२. हे म्हणणे खरे आहे की तांत्रीकदृष्टया शिफारस करताना मी वैयक्तीकरित्या उपस्थितीत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की आमच्याकडे कुठलेही प्रकरण पाठवलेनंतर केवळ तांत्रीक शिफारस केली जाते. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुत प्रकरणातील कुठलीही तांत्रीक शिफारस मी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की तांत्रीक पडताळणीशिवाय इतर कोणतीही पडताळणी आमच्या कार्यालयाकडुन केली जात नाही. हे म्हणणे खरे आहे की आमच्याकडुन तांत्रीक बाबींची शिफारस जिल्हाधिकारी यांना केली जाते. हे म्हणणे खरे आहे की आमच्या कार्यालयामार्फत कुठलाही आदेश काढला जात नाही. हे म्हणणे खरे आहे की बांधकामाबाबतच्या तांत्रीक बाबी आमच्यामार्फत पडताळल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की आमची शिफारस ही केवळ तांत्रीक बाबींची आहे. हे म्हणणे खरे आहे की ७/१२ उताऱ्याबाबतची व मालकीबाबतची चौकशी आम्ही करीत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई
दिनांक : २६.०९.२०२५

(ए. ए. पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
वाई.